# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 30233447 /422/491 फॅक्स -2269 2102/2269007.

E-Mail: dtedesk2@gmail.com Internet: http://www.dte.org.in

क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०१५/ 331

दिनांक : 4 MAR 2015

## अधिसूचना

पहा : १) या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१५/२२४, दि. १३.०२.२०१५
२) या संचालनालयाची अधिसूचना क्रमांक २/एनजीसी/मान्यता/२०१५/२३७, दि. २०.०२.२०१५

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी ऑन-लाईन पध्दतीने अर्ज करण्यास दि. ०२ मार्च, २०१५ व विलंब शुल्कास दि. ५ मार्च २०१५ पर्यंत दिलेल्या मुदतवाढीच्या अनुषंगाने परिषदेस सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाच्या http://www.dtemaharashtra.gov.in/courseapproval2015/ या लिंकवर दि. ०६.०३.२०१५ पर्यंत भरुन भरलेलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. तसेच परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाची हार्ड कॉपी या संचालनालयाच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालयांकडे दि. ०७.०३.२०१५ पर्यंत जमा करण्यात यावी.

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील ज्या विद्यमान व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थानी नवीन अभ्यासक्रम, सध्याच्या प्रवेश क्षमतेत वाढ, पीआयओ / एनआरआय च्या जागा व त्यांची मुदवाढ, डयुअल डिग्री व इंटीग्रेटेट प्रोग्राम इ. साठी परिषदेने दिलेल्या वाढीव मुदतीत अर्ज केले आहेत व ज्या संस्था संदर्भ क्रमांक २ अन्वये निर्धारीत केलेल्या सुनावण्यासाठी उपस्थित नव्हत्या अशा संस्थाच्या अर्जाची तपासणी करण्यासाठी दि. ०७.०३.२०१५ रोजी सकाळी १०.३० वाजता या संचालनालयाच्या समिती सभागृहता अंतिम सुनावणी घेण्यात येणार असून यानंतर सुनावणी होणार नाही याची संबंधित संस्थानी नोंद घ्यावी. **सदर सुनावण्यांसाठी येतांना संदर्भीन अधिसूचनेत नमूद केलेल्या कागदपत्रांसह संचालनालयाच्या संकेतस्थळावरील Annexure D मध्ये भरलेल्या सांख्यकीय माहितीच्या समर्थनार्थ आवश्यक त्या संबंधित कागदपत्रासह उपस्थित रहावे.**

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नवीन तांत्रिक संस्था / महाविद्यालये सुरू करणे, विद्यमान संस्थांचे नवीन जागेत स्थलांतरण, संस्था बंद करणे इ. बाबत ज्या संस्थानी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस अर्ज / प्रस्ताव सादर केले असतील अशा संस्थांनी दि. ०५.०३.२०१५ पर्यंत प्रस्तावाच्या प्रतीसह सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे संपर्क साधावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर
क्र. तशिसं / प्राकाना / शैवि—३ / जावैप्र / २०१५ / 659
दिनांक : - 5 MAR 2015

प्रति,
प्राचार्य / संचालक
सर्व विना अनुदानित पदवी / पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका संस्था
नागपूर विभाग, नागपूर

सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यांत येते की, सदर अधिसुचनेतील सुचनांनुसार कार्यवाही करण्यांत यावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर.